

चित्रपती
व्ही. शांताराम



आठवणीतले पपा...

पपांचा वरदहस्त सदैव डोक्यावर असतो - किरण शांताराम



चित्रपती व्ही. शांताराम यांचं हे जन्मशताब्दी वर्ष. यानिमित्ताने त्यांचे पुत्र किरण शांताराम आणि कन्या मधुरा जसराज यांनी आपल्या पित्याविषयी सांगितलेल्या हृद्य आठवणी...

पुन्हा दुसरे शांताराम होणे नाही - किरण शांताराम

महाराष्ट्रात दुसरा शिवाजी होणे नाही त्याप्रमाणे दुसरे शांतारामही होणार नाहीत. खरोखरच, पपांनी या चित्रपटसृष्टीसाठी केलेलं कार्य अतुलनीय आहे. आज उभा देश त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विविध कार्यक्रम करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देतोय.

पपांनी केलला संघर्ष फार मोठा आहे. चित्रपटसृष्टीतला त्यांचा सत्तर वर्षांचा प्रवास थोडाथोडका नाही. कोल्हापूरमध्ये त्यांचा जन्म झाला. शिक्षण घेणं शक्य नव्हतं. लहान वयात त्यांनी गंधर्व नाटक मंडळीत पडदा ओढण्याची नोकरी धरली. पुढे बाबूराव पेंटरांच्या महाराष्ट्र चित्रपट संस्थेत ते दाखल झाले. बाबूराव पेंटरांकडे त्यांनी चित्रपटनिर्मितीपासून अभिनयापर्यंत बारीकसारीक गोष्टी शिकून घेतल्या. त्यांच्याच *सावकारी पाश* (१९२५) मध्ये शेतकऱ्याची भूमिकाही केली. आणि १९२७ मध्ये पेंटरांच्या *नेताजी पालकर* चित्रपटाचं दिग्दर्शन केलं.

१९२८ मध्ये पपांनी स्वतःची प्रभात फिल्म कंपनी सुरू केली आणि मराठी, हिंदी तसंच तमिळ भाषेत चित्रपटनिर्मिती केली. १९४१ साली पपांनी स्वतःची राजकमल कलामंदिर निर्मिती संस्था स्थापन केली.

पपांच्या चित्रपटांविषयी बोलायचं झालं तर स्वतंत्र पुस्तक तयार होईल. आज बोलायचं आहे ते त्यांच्याविषयी. एक पिता म्हणून, दिग्दर्शक म्हणून, चित्रपती म्हणून आमच्या आठवणीतले पपा कसे होते?

पपांचं शिक्षण खूप झालं नाही. पण

त्यांचा व्यासंग दांडगा होता. वाचनाची त्यांना खूप आवड होती. कामाच्या व्यापातून थोडासाही वेळ मोकळा मिळाला तरी ते वाचन करत. वाचनामुळे ते खऱ्या अर्थाने समृद्ध झाले होते.

दो आँखे बारा हाथ चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान पपांना अपघात झाला आणि त्यांच्या डोळ्यांना इजा झाली. मी आईबरोबर त्यांना बघायला राजकमलमध्ये गेलो. आईचे पदराने डोळे पुसणं सुरू होतं. पपा मात्र शांत



मुलांत मूल होऊन खेळणारे पिता शांताराम



पपांची लाडकी कन्या मधुरा - जावई पंडित जसराज

होते. जणू काही झालंच नाही. त्यांचा हा धीरोदात्त स्वभाव मला प्रभावित करून गेला. आपणही पपांसारखं काहीतरी करायचं हे मी मनाशी नक्की केलं.

आणि मग *नवरंग*साठी त्यांना सहाय्यक म्हणून मी सेटवर जाऊ लागलो. पण सेटवर पित्याच्या नात्याने ते क्वचित राहात. तिथे ते दिग्दर्शक म्हणून जवळून पाहायला मिळत. पिता म्हणून आणि दिग्दर्शक म्हणूनही त्यांनी मला खूप शिकवलं. त्यांच्याबरोबर काम सुरू केल्यानंतर आमच्यातलं नातं मैत्रीपूर्ण होत गेलं.

पपांच्या शिस्तीबद्दल काय बोलायचं? त्यांना सेटवर धूम्रपान किंवा पान-तंबाखूचं सेवन केलेलं अजिबात खपत नसे. हा नियम अगदी मोठमोठ्या कलाकारांनाही लागू होता. एकदा पृथ्वीराज कपूर सेटवर धूम्रपान करत असताना पपांनी त्यांना धूम्रपान थांबवायला सांगितलं होतं. पण त्यांच्या शिस्तप्रिय स्वभावाची कल्पना असल्यामुळे लोकांना त्यात काही वावगं वाटत नसे. स्वतः पपा इतक्या लहान वयात या क्षेत्रात येऊन आणि इतकी वर्षं इथे राहून अखेरपर्यंत निर्व्यसनी राहिले. त्यांना सुपारीच्या खांडाचंही व्यसन नव्हतं. कसलं व्यसन होतं तर ते अहोरात्र काम करायचं.

त्यांच्या कामाचा झपाटा भलभल्यांना अचंबित करणारा होता. आम्ही त्यांना सदैव कामात गुंतलेलेच पाहायचो. पण त्यांचं घरावर आणि आम्हा मुलांवरही नितांत प्रेम होतं. त्यांचा मुलगा म्हणून मी आज त्यांचं काम पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न करतोय. पण जे पपांनी केलं त्या उंचीला पुन्हा कोणी जाऊ शकेल असं वाटत नाही. पपांची आठवण म्हणून मी त्यांची टोपी वापरतो. त्यामुळे मला माझ्या जबाबदारीची सदैव जाणीव राहते आणि मुख्य म्हणजे माझ्या मस्तकी पपांचा वरदहस्त आहे हा दिलासा त्यामुळे मला मिळतो.

पपांचा पुस्तकी शिक्षणावर विश्वास नव्हता - मधुरा जसराज

व्ही. शांताराम यांना चित्रपती म्हणतात ते उगाच नाही. दादासाहेब फाळकेंनी चित्रपटसृष्टीचा पाया घातला. बाबूराव पेंटरांनी त्यात कलेचा वारसा आणला आणि त्यांच्याही पुढे जाऊन एक व्यवसाय म्हणून या क्षेत्राला नावारूपाला आणलं ते व्ही. शांतारामांनी म्हणजे आमच्या पपांनी.

पपांनी खूप संघर्ष केला. पण तो आम्हाला पाहायला मिळाला नाही. फार लहान वयात त्यांना संघर्ष करावा लागला होता. आम्हाला समजू लागलं तेव्हा पपांचा ऊर्जितकाळ सुरू झाला होता. *कुंकू*, *माणूस*, *शेजारी* या चित्रपटांना मिळालेली सफलता, त्यावरून बनवलेले हिंदी *दुनिया न माने*, *आदमी* आणि *पडोसी* या चित्रपटांची लोकप्रियता यामुळे चित्रपट क्षेत्रात पपांचं नाव आदराने घेतलं जात होतं.

पण दिवसेंदिवस त्यांचा व्याप वाढतच होता. आपल्या व्यापात पपा आकंठ बुडाले होते. असं असलं तरी रविवारी म्हणजे सुट्टीच्या हक्काच्या दिवशी ते आम्हाला सहलीला घेऊन जात. आमच्याबरोबर स्वतः खेळायचे. पोहायला शिकवत. रेस लावायचे. इतर मुलं जशी लडिवाळपणे आपल्या वडिलांच्या अंगाखांद्यावर खेळतात तशी मीही त्यांच्या अंगाखांद्यावर वाढले. पिता म्हणून ते फार

प्रेमळ होते हे निःसंशय.

पपा काम खूप करायचे. त्यांचा एखादा चित्रपट पूर्णत्वाच्या मार्गावर असला की ते दिवसातले सोळा सोळा तास स्टुडियोत असायचे. अविश्रांत काम करायचे. एरव्ही निवांतपणा असला तरीही बारा तास काम करत असत. इतकं काम करण्यासाठी त्यांच्या अंगात एनर्जी कशी राहायची? ते स्वतः इतके एनर्जेटिक होते की त्यांच्या सहवासात राहणाऱ्यालाही काम करण्याचा उत्साह वाटावा.

पपांच्या कामाच्या झपाट्याइतकंच त्यांचं वाचनही दांडगं होतं. स्मरणशक्ती तर विचारूच नका. मी त्यांच्यावर पुस्तक लिहायला घेतलं तेव्हा ते ८५ वर्षांचे होते. पुस्तकातलं एक एक प्रकरण लिहून झाल्यावर मी त्यांना वाचून दाखवत असे. त्यावेळी त्यांना काही संदर्भ आठवले, बदल सुचले तर ते दुसऱ्या दिवशी फोन करून मला व्यवस्थित समजावत. ८५व्या वर्षीही त्यांना आपल्या भूतकाळातील बारीक-सारीक घटना व्यवस्थित आठवत होत्या.


स्वतः पपा प्रचंड कष्ट करत त्यामुळे मेहनती माणसं त्यांना प्रिय वाटायची. कदाचित म्हणूनच सतत काहीतरी करणं हा माझाही स्वभाव बनला असावा आणि म्हणून मी त्यांची लाडकी होते.

पपांना बरेचदा बाहेरगावी जावं लागायचं. ते इथे असले तरी त्यांच्या कामात व्यस्त असायचे. पण घराकडे त्यांनी कधीच दुर्लक्ष केलं नाही. त्यांचा धाक ते घरात नसतानाही आम्हाला वाटायचा. त्यांच्या अस्तित्वाची जाणीव असायची.

पपा शिस्तप्रिय होते तसेच वेळेची कदर करणारे होते. दिलेली वेळ पाळण्याकडे त्यांचा कटाक्ष असायचा. एकदा पपांच्या काही कामासाठी मला बाबूराव पेंढारकरांबरोबर आचार्य अत्रेंकडे जायचं होतं. मी आईच्या कामात थोडी अडकले. नंतर भूक लागली म्हणून काहीतरी खाऊन घराबाहेर पडले. बाबूकाकांना राजकमलमधून पिकअप करायचं आणि अत्रेंकडे जायचं म्हणून मी उशीर होण्याबद्दल फोन करून अत्रेंना कळवलं. राजकमलमध्ये पोहोचले तर बाबूकाकांबरोबर पपा बसले होते.

त्यांनी मला विचारलं, 'कितीची वेळ ठरली होती आणि आत्ता किती वाजलेत?' मी त्यांना उशीर होण्याचं कारण सांगितलं. मला भूक लागली होती हे कारण त्यांना पटलं नाही. ते म्हणाले, 'एक दिवस जेवली नसतीस तर? अशावेळी पटकन एखादं सँडविच घेऊन वाटेत खायचं, पण कोणाला दिलेली वेळ चुकवायची नाही.'

अशीच एकदा पुस्तकाच्या कामासाठी मी त्यांना भेटणार होते. वेळ अकराची ठरली होती. मला घरातून निघायलाच अकरा वाजले. वीस मिनिटांत मी पपांच्या ऑफिसला पोहोचले. आता ओरडा पडणार हे माहीत होतं. तसंच झालं. त्यांनी घड्याळ दाखवलं. मी स्पष्टीकरण सुरू केलं, 'पपा...' आणि माझं बोलणं तिथेच तोडत ते म्हणाले, 'तू आत्ता तुझ्या पपांना नाही व्ही. शांतारामना भेटायला आली आहेस. आणि त्यांच्यासाठी एक एक क्षण लाखमोलाचा असतो.' तेव्हापासून दिलेली वेळ पाळण्याचा स्वभावच बनून गेला आहे.



दो आँखे बारह हाथमध्ये व्ही. शांताराम

पपा कडक शिस्तीचे होते तसे खेळकरही होते. पुस्तकी शिक्षणावर त्यांचा विश्वास नव्हता. ते म्हणायचे जग ही मोठी शाळा आहे. इथे अनुभवांतून शिकलं पाहिजे. एकदा माझ्या रिझल्टवर दोन विषयांखाली लाल रेघ होती. आईने प्रगतिपुस्तक पपांकडे देऊन मला रागवायला सांगितलं. पपांनी मला बोलावलं आणि सज्जड दम भरला. एवढ्यात तिथून हिरमुसली होऊन जात असताना त्यांचे मिश्किल शब्द कानावर आले, 'बरोबर रागावलो ना?' हा प्रश्न अर्थात आईला होता.

आठवणी खूप आहेत. कितीही सांगितल्या तरी थोड्याच वाटतात.

प्रत्येक गोष्ट सुरुवातीपासून करायला शिका असं पपा नेहमी म्हणायचे. सेटवर घेऊन गेले तरी त्यांचं आमच्याकडे लक्ष असायचं. राजकमलमध्ये नकली फुलं बनवली जात. त्याचा स्वतंत्र विभाग होता. मीही एक दिवस फुलं शिकायला बसले. दिवसभर खपून चार-पाच फुलं बनवली आणि त्यांचा गुच्छ पपांना दिला. तर ते म्हणाले, 'फुलं छान बनवली आहेस, पण आधी तारेला कागद गुंडाळायला शीक. प्रत्येक गोष्ट सुरुवातीपासून शिकावी.' त्यांनी मला फिल्म मेकिंगचं तंत्र शिकवताना एक धडा दिला. त्यांच्या मते सोपं करणंच खरं अवघड असतं. कोणतीही कला शिकवून येत नाही तर ती उचलावी लागते.

आज आमच्या परीने आम्ही त्यांचा वारसा पुढे चालवतोय. पण पपांनी केलेलं काम आणि त्यांचा कामाचा झपाटा, व्याप पाहता आम्ही त्यांच्या पासंगालाही पुरणार नाही हेच खरं!

□ शब्दांकन: स्मिता प्रकाशकर